नियमीत दरखास्त क्र. ०७/२०२२
प्रकाश वि. सखाराम
CNR No.MHWS080017042022

निशाणी क्र. १३ खाली आदेश
(पारित दिनांक ०६.०५.२०२३)

धनकोने सदर अर्ज हुकुमनाम्याप्रमाणे ऋणकोविरुध्द वाद मिळकतीचा ताब्याचा वारंट काढून आदेशिका वाहक मार्फत धनकोला ताबा देण्याचा आदेश व्हावा आणि ७५०/– रुपये दाव्याचा खर्च ऋणकोची जंगम मालमत्ता जप्त करुन, हरास करुन धनकोला देण्याचा आदेश होण्याकरिता दाखल केला आहे. त्याच्या कथनानुसार, सदरचे प्रकरण वि. न्यायालयात न्याय प्रविष्ठ असून प्रकरणात ऋणकोचे म्हणणे करिता नेमलेले असून ऋणकोने न्यायोचित संधी मिळून सुध्दा प्रकरण लांबविण्याच्या उद्देशाने केवळ तारीख वाढविणेकरिता अर्ज दिलेले असून मुळात न्यायालयाने नि.दि.दा.क्र. १०२/२०१२ मध्ये दिनांक ०७.०४.२०२२ रोजीच दावा खर्चासह मंजूर करुन मुळ प्रतिवादीने मुळ वादीच्या वाद मिळकतीवरील २४ आर अतिक्रमण केलेली जमीन वादीला पुढील दोन महिन्यात परत करावी, असा दिनांक ०७.०४.२०२१ रोजीच पारीत केला असून ऋणकोने त्याचे पालन न केल्यामुळे धनकोने सदहू नियमीत दरखातस्त वि. न्यायालयात दाखल केलेली आहे.

०२ ऋणको हा धनकोला ताबा व दाव्याचा खर्च देण्यास टाळाटाळ करीत असल्याने नि.दि.दि. १०२/२०१२ मधील हुकुमनाम्याप्रमाणे मौजे कळमगव्हाण ता. रिसोड जि. वाशिम येथील गट क्र. ४० मधील २४ आर., वाद जमीन जिच्या चतुःसिमा पुर्वेस– ऋणको (मुळ प्रतिवादी) चे गट क्र. ४१ मधील शेतजमीन, पश्चिमेस–धनकोचे (मुळ वादी) च्या गट क्र. ४० मधील शेतजमीन, उत्तरेस–कळमगव्हाण ते कोळगाव शिव आणि दक्षिणेस– रस्ता आहे. सदर वाद मिळकतीवर ऋणकोने (मुळ प्रतिवादी) केलेले अतिक्रमण काढून ऋणकोविरुध्द वाद मिळकतीचा ताब्याचा वारंट काढून आदेशिका वाहकमार्फत धनकोला ताबा देण्याचा आदेश व्हावा व न्यायालयामार्फत धनकोला ताबा देण्यात यावा, तसेच ऋणकोकडून ७५०/– दाव्याचा खर्चाची मागणी करावी व न दिल्यास ऋणकोची जंगम मालमत्ता जप्त करुन हरार्स करुन धनकोला देण्यात येण्याची विनंती केली. सदरचा अर्ज मंजूर न झाल्यास धनकोचे कधीही भरुन न निघणारे नुकसान होणार असल्याने सदरचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

०३ याउलट ऋणकोच्या वकीलांनी मा. तदर्थ जिल्हा न्यायाधिश–०१, वाशिम नियमीत दिवाणी अपील मधील नि.क्र. ०५ वरील आदेशानुसार, प्रकरणात स्थगीती

असल्याने सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

**०४** अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदर प्रकरण दिनांक २९.११.२०२२ रोजी धनकोने नि.दि.दा.क्र. १०२/२०१२ च्या हुकुमनाम्याची अंमलबजावणी होण्याकरिता दाखल केले आहे. ऋणकोला दाव्याची नोटीस प्राप्त होऊन व वकीलांमार्फत हजर होऊनही त्याने म्हणणे दाखल न केल्याने त्याच्याविरुध्द म्हणणे नाही, असा आदेश दिनांक १०.०४.२०२३ रोजी पारीत करण्यात आला. त्यानंतर सदरचा अर्ज धनकोच्या वकीलांनी त्याचदिवशी दाखल केला आहे. त्यावर ऋणकोच्या वकीलांनी आज म्हणणे दाखल केले आहे. तसेच ऋणकोच्या वकीलांनी दस्तऐवज यादी नि.क्र. १६ खाली मा. जिल्हा न्यायाधिशांच्या आदेशाची एक प्रत दाखल केली आहे.

**०५** दोन्ही पक्षांचे कथन ऐकले. धनकोतर्फे आज नवीन वकील हजर झाले. जरी सदर अर्जानुसार मिळकतीच्या ताब्याचा वारंट काढून मालमत्ता जप्त व हरास करण्याचा आदेश होऊन मागितला असला तरी ऋणकोच्या वकीलांनी आजरोजी दाखल केलेल्या मा. जिल्हा न्यायाधिश, वाशिम यांच्या आदेशाची प्रत बघता नि.दि.अपील क्र. ४५/२०२२ या प्रकरणामध्ये मा. जिल्हा न्यायालयाने दिनांक १२.०४.२०२३ रोजी आदेश पारीत करुन नि.दि.दा.क्र. १०२/२०१२ मध्ये न्यायनिर्णयाला अपीलाच्या न्यायनिर्णयापर्यंत स्थगिती दिलेली आहे. त्यामुळे दोन्ही पक्षांचे कथन व प्रकरणाचे स्वरुप व सद्यस्थिती बघता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

सदरचा अर्ज या घडीला नामंजूर करण्यात येत आहे.

Digitally signed by YOGESH DATTATRAY KOINKAR
Date: 2023.05.06 18:12:33 +0530

(योगेश द. कोईनकर)

दिनांकः ०६.०५.२०२३ दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, रिसोड

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Rohit D. Pandit (Stenographer L.G.) |
| Name of court | : | C.J.J.D.& JMFC;Risod |
| Date | : | 06.05.2023 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer | : | 06.05.2023 |
| Judgment/Order uploaded on | : | 06.05.2023 |